महाराष्ट्र शासन
(विधी व न्याय विभाग)
धर्मादाय सह आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड

Govt. of Maharashtra
(Law and Judiciary Deptt.)
Joint Charity Commissioner,
Nanded and
Public Trusts Registration
Office, Nanded

जिजामाता धर्मशाळा पब्लीक ट्रस्ट,
चौधरी पेट्रोल पंपा जवळ,
रेल्वे स्टेशन समोर, नांदेड - ०२
दुरध्वनी/फॅक्स ०२४६२-२४९७७०

Jijamata Dharmashala Public Trust,
Near Choudhari Petrol Pump,
Opp. Railway Station, Nanded -02
Tel./Fax No. 02462-249770

इ-मेल E-mail-— supdtest.nd-mh@gov.in
वेबसाईट Web Site- www.mahacharity.gov.in

जा.क्र. आस्था / 534 /२०२६ दिनांक 2/ 3 /.२०२६

## सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी सेवानिवृत अधिकारी यांना कंत्राटी पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत जाहिरात

पहा :- महाराष्ट्र शासन ,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीबीई १५२५/प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३) दिनांक :१० जून, २०२५

संदर्भांकित शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार लघुलेखक क.श्रे. या संवर्गातील सेवानिवृत अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीवर यासोबत नमुद अटी व शर्तींवर धर्मादाय संघटनेत खालील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या जिल्हा कार्यालयात विवक्षीत कामासाठी नामिका सूची तयार करावयाची आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | जिल्हा/कार्यानय | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | लघुलेखक क.श्रे. | १ | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड | समकक्ष पदावर तीन वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवाराचा विचार करण्यात येईल. |

शासकिय कार्यालयात/ न्यायालयात धर्मादाय संघटनेत लघूलेखनाचे कामकाज केलेले सेवानिवृत अधिकारी यांची नेमणुक कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी करावयाची आहे. धर्मादाय संघटनेतील लघुलेखक (क.श्रे ) या संवर्गातील सेवानिवृत झालेले अधिकारी यांना प्राधान्य देण्यात येईल. सेवानिवृत अधिकारी यांना श्रुतलेखनाचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज मा.धर्मादाय सह आयुक्त, नांदेड यांच्याकडे ही जाहिर सुचना प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत प्राप्त होईल याप्रमाणे टपालाद्ववारे किंवा प्रत्यक्ष सादर करावेत. अर्जदाराने पाकिटावर सेवानिवत्त अधिकारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत असे स्पष्ट लिहुन त्या पदासाठी अर्ज सादर केला आहे .त्या पदाचे नाव लिहिण्यात यावे. तसेच अर्जासोबत आपले नाव व संपुर्ण पत्ता असलेले १७४ १० से.मि. आकाराचे दोन रिकामे पाकिटावर रूपये ४०/- इतके रकमेचे पोस्ट तिकिट चिकटवून अर्जासोबत सादर करावीत.उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा व अपुर्ण असलेल्या अर्जाचा विचार

करण्यात येणार नाही . सदर नेमणुक पात्र उमेदवाराच्या मुलाखतीद्वारे प्रादेशिक विभाग प्रमुख तथा धर्मादाय सह आयुक्त, नांदेड यांच्या आदेशादवारे करण्यात येईल

2/3/2026

(श्रीमती हिरा का. शेळके)
धर्मादाय सह आयुक्त
नांदेड विभाग नांदेड,करीता

**सदर नेमणुका हया खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत अधिकाऱ्याने ज्या पदासाठी अर्ज केला आहे. त्या पदाच्या विविक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता व किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणुका ह्या एक वर्षाच्या कालावधीसाठी आहेत. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेऊ शकतात.

३. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट शासन सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्रमांक :सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,मुंबई ४०००३२. दिनांक : १० जून, २०२५ मधील अटी व शर्तीप्रमाणे मासिक परिश्रमीक त्यांना अनुज्ञेय राहील.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल. याबाबत अर्जदाराने रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञालेख देणे बंधनकारक राहील.

५. करार पध्दतीवर नियुक्ती करण्यात येणाऱ्या व्यक्ती त्याच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच पदावर कार्यरत राहु शकतील.

६. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत व्यक्ती यांनी त्यांची शाररिक , मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबतचे , स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेली कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व बंधपत्र/हमीपत्र अटी व शर्ती संबंधित उमेदवाराला मान्य आहेत याबाबतचे उमेदवाराने रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

८. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत व्यक्ती विरूध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालू अथवा प्रलंबित नसावे.याबाबत अर्जदाराने स्व्यंघोषणापत्र देणे बंधनकारक राहील.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपवलेल्या सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुतलेला नसावा. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict or intersted) जाहिर करणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्ती यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृतीच्या वेतनमानास अनुसरून प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२. करार पध्दतीवरील व्यक्ती यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती , कामाबाबत आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे बंधनकारक राहील.

१३. करार पध्दतीवरील नियुक्त व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीस नेमुन दिलेले काम समाधानकारक असल्यास कोणतेही सबब कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१४. कार्यालयाच्या कामकाजाच्या आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्ती यांना नेमुन दिलेल कार्यालय जिल्हा यामध्ये बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण यांना राहतील.

१५. प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच प्रक्रिया थांबवण्याचे किंवा रदद करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत. आवश्यकतेनुसार जाहिरातीतील नमुद केलेली पदे कमी / अधिक होवू शकतील.

2/3/2026

(श्रीमती हि.कों. शेळके)
धर्मादाय सह आयुक्त
नांदेड विभाग नांदेड,करीता

**धर्मादाय संघटनेतील सेवा करार पध्दतीने विविक्षित कामासाठी**
**सेवानिवृत लघुलेखक क.श्रे. यांची नेमणुक करार पध्दतीने घेणेबाबतचा अर्ज .**

प्रति ,
मा.धर्मादाय सह आयुक्त,
नांदेड विभाग, नांदेड.

अर्ज केलेल्या पदाचे नाव : - ..........................................................................................
व काम करण्यास इच्छुक ठिकाण ..........................................................................................

१.अर्जदाराचे नाव : -

२.कायमचा पत्ता : -

३.दुरध्वनी क्र/
भ्रमणध्वनी सह (अनिवार्य ) : -

४.ई मेल (अनिवार्य ) : -

५.सध्याचा पत्ता : -

६.जन्म तारिख : -

७.राष्टीयत्व : -

८.प्रवर्ग : -

९.लिंग पुरूष/महिला : -

१०.अवगत भाषा : -

११. शैक्षणिक माहिती
पदवी/पदविका/इतर : -

१२.अनुभव : -

| अ.क्र. | हुददा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१३.सेवानिवृत्तीचा दिनांक : -

(2)

१४.सेवानिवृत ज्या कार्यालयातून झाले त्या कार्यालयाचे नाव व सेवानिवृत्तीचे पद: -

१५.सेवानिवृत्ती वेतन: -

१६.सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशील
(वर नमुद तपशीलाबाबत आवश्यक ते पुरावे साक्षांकित करून अर्जासोबत जोडावे )

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

प्रतिज्ञापत्र

मी .................................................................................................. प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते कि, आपण प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे वाचन केले असून ते मला पुर्णपणे मान्य आहे.

दिनांक : -
ठिकाण : -

स्वाक्षरी